**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**उपविभागीय अधीकारी,राधानगरी-कागल उपविभाग,कोल्हापूर.**

## पाझर तलाव तमनाकवाडा, ता.कागल

**--- भुसंपादनाची जाहीर नोटीस ---**

कोल्हापूर जिल्हयातील तमाम लोकांना या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, उपविभाग राधानगरी-कागल तहसिल पैकी मौजे तमनाकवाडा ता.कागल येथील खालील अनुसुची मध्ये दर्शविल्याप्रमाणे जमीन धारकांच्या जमीनी मा.राज्यपाल महाराष्ट्र शासन यांच्या नांवे जलसंधारण विभागाचे प्रधिकृत प्रतिनिधी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कोल्हापूर हे पाझर तलाव तमनाकवाडा ता.कागल या योजनेच्या भुसंपादन कामासाठी आवश्यक जमीनी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्र. संकिर्ण -०३/२०१५/ प्रक्र ३४/अ-२ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १२ मे २०१५ ,३० सप्टेंबर २०१५ व दि. २५ जानेवारी २०१७ व दि.२७ नोहेंबर २०१७ मधील तरतूदीनुसार मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र. भुसं/कार्या-११/आरआर/३७१/१९ दि.१०/०६/२०१९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदीपध्दतीने सार्वजनिक प्रयोजनासाठी खरेदी करणेचे प्रस्तावित केले आहे.

यातील खालील अनुसूचीमध्ये संबंधीत जमीन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन क्षेत्र इ. तपशिल दिला आहे. सदर जमीनीबाबत जमीन मालकाच्या हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लीज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, करारमदार व इतर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायं. ५.०० पर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने इकडील कार्यालयास कळवावे.

मुदतीत कोणतीही हरकत न अल्यास सदरहू जमीन मालकांची मिळकत निर्वेध, निर्जोक,निष्कर्जी व निजोखमीची असल्याचे समजून इकडील कार्यालय मा.राज्यपाल,महाराष्ट्र शासन यांचे वतीने मुदतीनंतर केव्हांही पुढे सरळ खरेदी पध्दतीने संपादनाची /खरेदीची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल. तदनंतर दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत वा तक्रार असल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही संपादन पूर्व जाहीर नोटीस दिली.

तारीख -१५/०६/२०१९.

Scanned by CamScanner

# अनुसूची

**कामाचे नांवः- पाझर तलाव तमनाकवाडा,ता.कागल,जि.कोल्हापूर.**

**खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी करणे. (मौजे तमनाकवाडा,ता.कागल,जि.कोल्हापूर)**

| अ.क्र. | गट क्र. | गांव | संपादीत क्षेत्र हे. आर | जमीन मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | ३९७ ब | तमनाकवाडा | ०.५७.०० | श्री. दत्तू धोंडिबा लांडगे वै. ५ |
| २. | ३९९ पै. | | ०.१३.५० | श्री. गजानन केरबा चौगले वै.१५ |
| ३. | ४०३ पै. | | ०.०९.०० | श्री. गजानन केरबा चौगले वै.८ |
| ४. | ४०५ पै. | | ०.२१.०० | सौ. अलका संजयकुमार चौगले |
| ५. | ४०६ | | १.०२.०७ | श्री. दत्तू धोंडिबा लांडगे वै. २७ |
| ६. | ४०७ पै. | | २.७४.०० | श्री. लक्ष्मी देवी वडगांव वहीवाटदार |
| ७. | ४१३ पै. | | ०.७३.४३ | श्री. दत्तू धोंडिबा लांडगे वै.४ |
| | | **एकूण** | ५.५०.०० | |

स्थळ :- कोल्हापूर
दिनांक :- १५/०६/२०१९

उपविभागीय अधिकारी,
राधानगरी-कागल उपविभाग, 14/06/19
कोल्हापूर

उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग,
गडहिंग्लज

जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग,
कोल्हापूर

(ॲड.व्ही.एन.पाटील)
संपादन मंडळाचे वकील

Scanned by CamScanner